SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
PHONE: EPABX – 0091-0231-2609000 COE Office: 0231-2693176 Engg.Exam.Section: 0231-2609122
Website: www.unishivaji.ac.in E-mail: coe@unishivaj.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट
दूरध्वनी :(ईपीएबीएक्स) 0091-0231-2609000 संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ: 0231-2693176
अभियांत्रिकी व तंत्रज्ञान परीक्षा विभाग : 0231-2609122 फॅक्स : 0091-0231-2690655
वेबसाईट : (www.unishivaji.ac.in) ई मेल coe@unishivaji.ac.in
Estd :1962
NAAC 'A ++' Grade

जा.क्र./शिवाजी वि./ऑनपरीक्षा/३१२ दिनांक – 12 APR 2021

# परिपत्रक

## अत्यंत तातडीचे/महत्वाचे आणि कालमर्यादित

संदर्भ — जा.क्र./शिवाजी वि./ परीक्षक नियुक्ती/चव्हाण/३९९A दिनांक–०५/०४/२०२१

कोविड–१९ चा प्रादुर्भाव व सध्या पुन:श्च बाधित रूग्णांची संख्या वाढत असल्यामुळे उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये दिनांक ०६/०४/२०२१ ते दि.१२/०४/२०२१ या कालावधीतील सर्व अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने होणा–या परीक्षा स्थगित करण्यात आलेल्या आहेत. **सध्या कोविड बाधित रूग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्रामध्ये लागू करण्यात आलेली संचारबंदी व इतर निर्बंध विचारात घेता ऑफलाईन पध्दतीने परीक्षा घेणे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सद्यस्थितीत उचित होणार नाही.**

सबब, ज्या विद्यार्थ्यांनी **विद्यापीठामार्फत घेण्यात येणा–या हिवाळी सत्र २०२० करीता** यापूर्वी ऑफलाईन पध्दतीचा परीक्षेचा पर्याय निवडलेला आहे आणि ज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा दिनांक ०६/०४/२०२१ पासून ऑफलाईन पध्दतीने होणार/सुरू होत्या **अशा सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देण्यासाठी पर्याय निवडण्यासाठी दि.१०/०४/२०२१ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत खालीलप्रमाणे लिंकचा पर्याय विद्यार्थी स्तरावर उपलब्ध करून देण्यात आहे.**

Web Page ➡ online.unishivaji.ac.in
Tab ➡ October 2020 Exam
Link ➡ Selection of OFFLINE to ONLINE Option (Update Students Mobile No, Email ID)

तरी ऑफलाईन पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांनी स्वत:च्या व समाजाच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ऑनलाईन पध्दतीचा पर्याय उपरोक्त संगणक प्रणालीमध्ये सादर करावा. निवडलेल्या पर्यायाची पोहोच पावती/Confirmation Receipt ची प्रिंट विद्यार्थ्यांनी सोबत ठेवावी. तसेच संबंधित अधिविभाग/महाविद्यालयाने ऑफलाईन पध्दतीने परीक्षेच्या पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणेबाबत व वरील उपलब्ध करून देण्यात आलेल्या लिंकमधून पर्याय सादर करणेसाठी आपले स्तरावरून अवगत करण्यात यावे.

तसेच आपवादात्मक परीस्थितीनुसार जे विद्यार्थी ऑफलाईन पध्दतीनेच परीक्षा देणार असतील तर अशा विद्यार्थ्यांची परीक्षा कोविड प्रार्दुभाव कमी झालेनंतर यथावकाश घेण्यात येईल. याबाबत स्वंतत्रपणे परिपत्रकाद्वारे यथावकाश कळविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**( टिप– अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार (Engineering, Pharmacy, Architecture, Law, Education & M.B.A.) या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा क्लस्टर पध्दतीने होत असल्याने सदर विद्यार्थ्यांच्या नोंदी या लिंकमध्ये करण्यात येवू नयेत.)**

आपला विश्वासू,

प्र.संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति —

१) मा.विभागप्रमुख/संचालक/समन्वयक,
पदवी व पदव्युत्तर अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
२) मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये,
३) मा. संचालक, दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
४) आय टी सेल– योग्यत्या सुविधा उपलब्ध करणेबाबत.